अतिप्रदान व अखर्चित (अर्थसंकल्पीत) निधीचा
परतावा शासनास भरणा (जमा) करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक:- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.१७/२०२६/कोषा प्रशा ५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
तारीख: ११ मे, २०२६

**वाचा:-** १) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.बीजीटी-२०१५/प्र.क्र.७१/अर्थसंकल्प-२, दि.०४ मार्च, २०१५.
२) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.बीजीटी-२०१५/प्र.क्र.७१/अर्थ-२, दि.१४ मे, २०१५.
३) वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दि.१४ फेब्रुवारी, २०२४.

## परिपत्रक

प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे, आहरण व संवितरण अधिकारी उचित नियमांचे पालन करुन, कोषागारातून आवश्यकतेप्रमाणे निधी आहरित करुन अंतिम अदात्यांना प्रदान करतात. तथापि अनेक प्रकरणी प्रचलित नियमांप्रमाणे, अंतिम अदाते निश्चित नसताना, आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना, निधी आहरित करुन प्रथम स्वत:च्या बँक खात्यामध्ये ठेवून तो खर्च करावा लागतो. कोषागारातुन आहरित केलेला निधी विहित मुदतीत खर्च न केल्यास तो शासनास परत करावा लागतो. कोषागारातून आहरित केलेल्या निधी संबंधात, काही प्रकरणी अतिरिक्त प्रदाने झालेली असतात, काही प्रकरणी निधी चुकीच्या कारणासाठी आहरित केलेला असतो, अथवा ज्या प्रयोजनासाठी निधी आहरित केलेला असतो त्या प्रयोजनावर तो खर्च करणे शक्य नसते, अशा सर्व प्रकरणी, कोषागार/अधिदान व लेखा कार्यालयामधून आहरित केलेला निधी ज्या कार्यालय/संस्थांकडे विनावापर पडून आहे, त्यांना सदर निधी शासन खाती परत जमा करावा लागतो.

कोषागारातून आहरित केलेला निधी कोषागारात परत भरणा करणे ही **अपवादात्मक** बाब असल्याने, भरणा करणाऱ्या यंत्रणांकडून शासकीय रकमा भरणा करण्यासाठी वापरावयाच्या महाराष्ट्र कोषागार नियम **नमुना क्र. ६** च्या चलन नमून्यामधील लेखांकन तपशिल भरताना अनेक चुका होतात. वास्तविकता या रकमा कोषागारातून आहरित करताना खर्च म्हणून नोंदविलेल्या असल्याने, या परत भरणा करताना **"वजा खर्च"** म्हणून नोंदविणे आवश्यक असताना, अनेक प्रकरणी त्या चुकीच्या जमाशिर्षाखाली भरल्या जातात. भरणा करणाऱ्या कार्यालय/संस्था यांनी, सदरच्या चलनांवर "वजा खर्च" दर्शविण्यासाठी योग्य खर्च लेखाशिर्ष नमूद केले तरी कोषागार लेख्यामध्ये **"वजा खर्च"** दर्शविण्याची कार्यपद्धती नसल्याने, कोषागारे अशा रकमा चुकीच्या लेखाशिर्षाखाली नोंदवितात.

या विषयी संदर्भ क्र.१ अन्वये सूचना निर्गमित केलेल्या आहेत. मात्र संदर्भ क्र.१ मधील कार्यपद्धती कोषागारांना लागू नसल्याने संदर्भ क्र.२ अन्वये उक्त सूचना कोषागारासंदर्भात निरसित केलेल्या आहेत तसेच संदर्भ क्र.२ अन्वये कोषागारासंदर्भात पूर्वीचीच कार्यपद्धती अनुसरावी, असे नमूद केलेले आहे, महालेखापाल कार्यालयाने SNA संदर्भातील अखर्चित रकमा भरणा करण्यासंदर्भात शासनाने सूचना

निर्गमित कराव्यात असे कळविले आहे. या शिवाय संदर्भ क्र.३ अन्वये कार्यान्वित झालेल्या आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) प्रणालीमध्येही विहीत मुदतीनंतर रकमा शासनखाती परत करण्याचे निर्देश आहेत.

अखर्चित/ अतिप्रदान वसुलीच्या रकमा या पूर्वी कोषागारातून आहरित करताना खर्च म्हणून नोंदविलेल्या असतात. अशा रकमांचा भरणा झाल्यानंतर त्यांचे लेखांकन **"वजा खर्च"** म्हणून होणे आवश्यक ठरते. अधिदान व लेखा कार्यालयाच्या लेख्यामध्ये **"वजा खर्च"** नोंदविण्याची सुविधा असल्याने त्यांचे लेखांकनास तत्वत: अडचणी नाहीत. कोषागारामध्ये **"वजा खर्च"** नोंदविण्याची सुविधाच नसल्याने, अशा रकमांचे कोषागारात जमा लेखाशिर्षामध्ये तात्पुरते लेखांकन केले जाते. महालेखापाल कार्यालय स्तरावर हस्तातरण नोंदवही (T.E) द्वारे सदर जमा रकमांचे अंतिम लेखाकन संबंधित खर्चाच्या लेखाशिर्षाखाली **"वजा खर्च"** स्वरुपात केले जाते. तथापि कार्यपद्धतीच्या विस्तृत माहितीअभावी या विषयीची चलने कोषागारातून महालेखापाल कार्यालयास सादर केले जात नाहीत. परिणामी, महालेखापाल कार्यालयास संबंधित चलने **"वजा खर्चाची"** असल्याची माहितीच मिळत नसल्याने, त्यांचे चुकीच्या जमा लेखाशिर्षाखाली लेखांकन केले जाते.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन अखर्चित/ अतिप्रदानाच्या वसुलीच्या रकमा शासन खाती भरण्यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

अ) **<u>अधिदान व लेखा कार्यालयात जमा करावयाच्या अखर्चित/ अतिप्रदानाच्या वसुलीच्या रकमा</u>**:-

अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आहरण व संवितरण अधिकारी/ अन्य शासकीय यंत्रणांना, त्यांच्याकडील अखर्चित रकमा, त्यांच्याकडून अतिप्रदान झालेल्या रकमांच्या वसूली, यांचा भरणा भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्र. ६ मध्ये करावा लागतो. अधिदान व लेखा कार्यालयाने **"वजा खर्चाचे"** लेखांकन करण्यासाठी जमा/खर्चाच्या प्रत्येक मुख्य लेखाशिर्षासाठी **"RBI मध्ये स्वतंत्र खाते क्रमांक"** सुरू केलेला आहे. या विषयीची सद्यस्थितीमधील यादी **<u>"परिशिष्ट अ"</u>** म्हणून सोबत जोडण्यात येत आहे.

मागील आर्थिक वर्षासंबंधीच्या अखर्चित वसुलीच्या रकमा शासन खाती जमा करू इच्छिणाऱ्या कार्यालयांनी, भरणा करावयाची रक्कम, ज्या खर्च लेखाशिर्षा मधून आहरित केली, त्या खर्च लेखाशिर्षासंबंधित **"परिशिष्ट अ"** मध्ये नमूद **"RBI खाते क्रमांक"** चलनाच्या शिरोभागी लाल शाईने स्पष्ट लिहावा. जर शासन खाती <u>जमा करावयाची अखर्चित रक्कम</u> मागील आर्थिक वर्षासंदर्भातील असेल, तर चलनाच्या शिरोभागी (RBI खाते क्रमांक खाली) गौण शिर्ष **"९१२-अखर्चित रकमांचा भरणा"** हा तपशिल नमूद करावा. चलनामधील मध्य स्तंभात (भागात) "लेखाशिर्ष तपशिल" मध्ये भरणा करावयाच्या रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरित केल्या, त्याचे पंचस्तरीय लेखावर्गीकरणचा तपशिल नमूद करावा. हा तपशिल मुळ खर्च देयकाच्या प्रथम पृष्ठावर उपलब्ध असतो. चलनामध्ये उर्वरित माहिती प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे अचूकपणे भरावी.

जर अतिप्रदानाची वसुली मागील आर्थिक वर्षातील असेल, तर चलनाच्या शिरोभागी **"RBI खाते क्रमांक"** चलनाच्या शिरोभागी लाल शाईने स्पष्ट लिहावा. त्याखाली चलनाच्या शिरोभागीच गौण शिर्ष **"९११- अतिप्रदानाची वसुलीच्या रकमा"** हा तपशिल नमूद करावा. चलनामधील मध्य स्तंभात (भागात) "लेखाशिर्ष तपशिल" मध्ये भरणा करावयाच्या रकमा ज्या लेखाशिर्षामधून आहरित केल्या, त्याचा पंचस्तरीय

लेखाशिर्ष वर्गीकरणचा तपशिल नमूद करावा. अतिप्रदानाची वसुली मागील आर्थिक वर्षासंदर्भातील रकमांचा भरणा करताना अशा प्रकरणी अधिदान व लेखा कार्यालयामार्फत त्यांचे लेखांकन ९११- अतिप्रदानाची वसुली या गौणशिर्षाखाली संबंधित खर्च लेखाशिर्षांतर्गत केले जाते.

जर भरणा रक्कम चालू वर्षामध्ये आहरित केलेली असेल तर, वर वर्णन केल्याप्रमाणे चलनामध्ये **"RBI खाते क्रमांक"** व लेखा विषयक तपशिल नोंदवावा. मात्र (चालू आर्थिक वर्षामध्ये आहरित केलेल्या अखर्चित/अतिप्रदान वसुली संदर्भातील भरणा असेल तर शिरोभागी गौणशीर्ष ९११, ९१२ विषयक तपशील नमूद करू नये.) अधिदान व लेखा कार्यालयात, चालू वर्षाच्या अखर्चित/ अतिप्रदानाची वसुलीच्या जमा रकमा संबंधित लेखाशिर्षाखाली **"वजा खर्च"** म्हणून नोंदविल्या जातात. परिणामी, संबंधित लेखाशिर्षाचा चालू वर्षाचा एकूण क्रमवर्धीत खर्च कमी होतो.

मागील अर्थिक वर्षामधील अखर्चित/ अतिप्रदानाची वसुलीच्या जमा रकमा मात्र ९१२ - अखर्चित रकमा /९११- अतिप्रदानाची वसुलीच्या जमा रकमा या गौण शिर्षाखाली स्वतंत्रपणे दर्शवल्या जातात. त्यांचा चालू अर्थिक वर्षाच्या संबंधित लेखाशिर्षाच्या क्रमवर्धीत खर्चावर परिणाम होत नाही.

ब) **कोषागार कार्यक्षेत्रामध्ये भरणा:-**

मागील वर्षासंबंधीच्या अखर्चित रकमांचा भरणा करु इच्छिणाऱ्या कार्यालय/ संस्थां यांनी, त्यासाठी महाराष्ट्र कोषागार नियम **नमुना क्र.६** या चलन नमुन्याचा वापर करावा. भरणा करावयाची अखर्चित रक्कम मागील आर्थिक वर्षामध्ये आहरित केलेली असल्यास **"गौण शीर्ष-९१२-अखर्चित रकमांचा भरणा"** हा तपशील चलनाच्या शिरोभागी लाल शाईने लिहावा. चलनाच्या शिरोभागीच गौणशीर्ष तपशिलाखाली लाल शाईने अखर्चित रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरीत केल्या त्या खर्च लेखाशिर्षाचे पंचस्तरीय वर्गीकरण व CRC कोड अचूकपणे लिहावा. चलनाच्या मध्य स्तंभामध्ये(भागामध्ये) "लेखाशीर्ष तपशील" या भागात **००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०- इतर सेवा, ८००- इतर जमा, (०१) (१६) संगणक संकेतांक "००७०००७६२०१" संकीर्ण,** हा तपशील कोषागार लेखांकनासाठी नमूद करावा.

भरणा करावयाची रक्कम मागील अर्थिक वर्षामध्ये आहरित केलेली, अतिप्रदान वसुलीची रक्कम असल्यास, अतिप्रदान वसुलीच्या रकमा शासन खाती जमा करु इच्छिणाऱ्या कार्यालयांनी चलनाच्या शिरोभागी "गौण शीर्ष-९११- अतिप्रदानाची वसूलीच्या रकमा" हा तपशील नोंदवावा. चलनाच्या शिरोभागीच गौणशीर्ष तपशिलाखाली लाल शाईने अखर्चित रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरीत केल्या त्या खर्च लेखाशिर्षचे पंचस्तरीय वर्गीकरण व CRC कोड अचूकपणे लिहावा. चलनामधील मध्य स्तंभात(भागात) "लेखाशिर्ष तपशिल" याभागात **००७०- इतर प्रशासनिक सेवा, ६०- इतर सेवा, ८००- इतर जमा, (०१) (१६) - संगणक संकेतांक "००७०००७६२०१" संकीर्ण** हा तपशील कोषागार लेखंकनासाठी नमूद करावा.

शासन खाती जमा करावयाच्या रकमा चालू आर्थिक वर्षामध्ये आहरित केलेल्या अखर्चित/अतिप्रदान वसुली संदर्भात असल्यास, चलनाच्या शिरोभागी लाल शाईने अखर्चित रकमा ज्या खर्च लेखाशिर्षामधून आहरीत केल्या त्या खर्च लेखाशिर्षाचे पंचस्तरीय वर्गीकरण व CRC कोड अचूकपणे लिहावा. (चालू आर्थिक वर्षामध्ये आहरित केलेल्या अखर्चीत/अतिप्रदान वसुली संदर्भातील भरणा असेल तर शिरोभागी गौणशीर्ष ९११, ९१२, विषयक तपशील नमूद करू नये.)

**टिप : -** वरील कार्यपद्धतीमध्ये विशिष्ट शब्दयोजना लाल शाईने नोंदविण्याविषयी सूचना आहेत. एखादे कार्यालय उक्त विषयी संगणकीय चलन वापरणार असेल तर त्यांनी उक्त तपशिल " Bold" स्वरूपात मुद्रित करुन त्याखाली लाल शाईने अधोरेखित करावे.

क) **कोषागाराने लेखांकन करताना घ्यावयाची दक्षता:-**

कोषागाराने वरील तीनही प्रकरणी (अखर्चीत/अतिप्रदान वसुली बाबतीत) कोषागार मध्ये लेखांकन करताना चलनामधील लेखांकन तपशील या भागामध्ये दर्शवलेल्या या **संगणक संकेतांक "००७०००७६२०१" संकीर्ण,** खाली करावे.

सर्वसाधारणपणे कार्यपद्धती म्हणून जमेचे लेखांकन कोषागार स्तरावर केले जाते व तत्संबंधी चलने महालेखापाल कार्यालयास सादर केली जात नाहीत. तथापि अखर्चीत/अतिप्रदान वसुलीच्या जमा यांचे **"वजा खर्च"** म्हणून लेखांकन महालेखापाल कार्यालयाकडून होणार असल्याने अखर्चित/अतिप्रदान वसुली साठी कोषागारामध्ये तात्पुरत्या स्वरुपात लेखांकन करण्यासाठी निश्चित केलेल्या **संगणक संकेतांक "००७०००७६२०१" संकीर्ण** संबंधातील सर्व चलने व त्यासंबंधीची स्वतंत्र जमासूची (Receipt schedule) महालेखापाल कार्यालयास सादर करावी. प्रत्येक महिन्यामध्ये "वजा खर्चाची" कोषागाराने लेखांकित केलेली सर्व चलने महालेखापाल कार्यालयास सादर केली जात आहेत याची खात्री करून कोषागार अधिकारी यांनी मासिक लेख्यावर स्वाक्षरी करावी. **संगणक संकेतांक "००७०००७६२०१" संकीर्ण** संदर्भातील एखादे चलन अप्राप्त असल्याची सूचना महालेखापाल कार्यालयाकडून आल्यास तद्संबंधिचे दुय्यम चलन/महालेखापाल कार्यालयास आवश्यक असणारा लेखांकन विषयक तपशिल त्वरीत, महालेखापाल कार्यालयास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०५१११२५५००४४०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.05.11 12:56:42 +05'30'

**( रविकुमार लिंगनवाड )**
**शासनाचे उप सचिव**

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य.
८. अ.मु.स./प्र.स./सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.

९. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिनस्त असलेल्या सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख, व कार्यालय प्रमुख
१०. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई,
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२४. सर्व विभागीय आयुक्त,
२५. सर्व जिल्हाधिकारी,
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२७. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२८. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,
२९. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे/ नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
३०. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
३१. प्रादेशिक सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर,
३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे /नाशिक /छत्रपती संभाजीनगर /अमरावती /नागपूर
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३४. सर्व उप कोषागार अधिकारी,
३५. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३६. निवड नस्ती कोषा प्र.५

# “परिशिष्ट अ”

| Sl.N | Account Number | Account Name |
|---|---|---|
| 1 | 01511801036-INR | LIASON OFFICER GOVT. OF GUJRAT |
| 2 | 01512901058-INR | 0028 PROFESSION TAX |
| 3 | 01512901066-INR | 0029 LAND REVENUE |
| 4 | 01512901069-INR | 0030 STAMPS AND REGISTRATION FEES |
| 5 | 01512901073-INR | 0039 STATE EXCISE |
| 6 | 01512901074-INR | 0040 OTHER RECEIPTS (SALES TAX) |
| 7 | 01512901075-INR | 0040 SALES TAX |
| 8 | 01512901078-INR | 0040 SALES TAX-SALES TAX CENTRAL |
| 9 | 01512901083-INR | 0041 TAXES ON VEHICLES |
| 10 | 01512901084-INR | 0042 TAXES ON GOODS PASSENGERS |
| 11 | 01512901086-INR | 0043 TAXES DUTIES ON ELECTRICITY |
| 12 | 01512901091-INR | 0045 OTHER TAXES DUTIES COMM. SERVICES. |
| 13 | 01512901094-INR | 0049 INTEREST RECEIPTS |
| 14 | 01512901095-INR | 0050 DIVIDENDS AND PROFITS |
| 15 | 01512901097-INR | 0051 PUBLIC SERVICE COMMISSION |
| 16 | 01512901098-INR | 0055 POLICE |
| 17 | 01513001013-INR | 0215 WATER SUPPLY and SANITATION |
| 18 | 01513001015-INR | 0216 HOUSING |
| 19 | 01513001017-INR | 0217 URBAN DEVELOPMENT |
| 20 | 01513001018-INR | 0220 INFORMATION AND PUBLICITY |
| 21 | 01513001019-INR | 0230 LABOUR AND EMPLOYMENT |
| 22 | 01513001020-INR | 0235 SOCIAL SECURITY AND WELFARE |
| 23 | 01513001021-INR | 0252 OTHER SOCIAL AND COMMUNITY SERVICES |
| 24 | 01513001024-INR | 040 SALES TAX-SALES TAX STATE-WORKS CONTRACT |
| 25 | 01513001029-INR | 0403 ANIMAL HUSBANDRY |
| 26 | 01513001033-INR | 0404 DAIRY DEVELOPMENT |
| 27 | 01513001034-INR | 0405 FISHERIES |
| 28 | 01513001038-INR | 0408 FOOD, STORAGE WAREHOUSING |
| 29 | 01513001041-INR | 0425 CO-OPERATION |
| 30 | 01513001045-INR | 0506 LAND REFORMS |
| 31 | 01513001057-INR | 0851 VILLAGE AND SMALL INDUSTRIES |
| 32 | 01513001058-INR | 0852 INDUSTRIES |
| 33 | 01513001059-INR | 0853 MINES AND MINERALS |
| 34 | 01513001065-INR | 1051 PORTS and LIGHTHOUSES |
| 35 | 01513001002-INR | 0058 STATIONERY AND PRINTING |
| 36 | 01513001003-INR | 0059 PUBLIC WORKS |
| 37 | 01513001005-INR | 0070 OTHER ADMINISTRATIVE SERVICES |
| 38 | 01513001007-INR | 0071 CONTRBS RECS TWRDS PEN. OTHER RET. BENEFI TS |
| 39 | 01513001008-INR | 0075 MISC.GENERAL SERVICES |
| 40 | 01513001010-INR | 0202 EDUCATION, SPORTS, ART and CULTURE |
| 41 | 01513001011-INR | 0210 MEDICAL and PUBLIC HEALTH |
| 42 | 01513101039-INR | 2040 TAXES on SALES, TRADE, etc. - EXPENDITURE ACC OUNT |
| 43 | 01513101040-INR | 2041 ROAD TRANSPORT OFFICE(DRAWING ACCOUNT) |
| 44 | 01513101044-INR | 2041 TAXES ON MOTOR VEHICLES ( REFUND ) |

| | | |
|---|---|---|
| 45 | 01513101045-INR | 2041 TAXES ON VEHICLES -EXPENDITURE ACCOUNT |
| 46 | 01513101046-INR | 2045 TAXES ON GOODS PASSENGERS |
| 47 | 01513101051-INR | 2051 PUBLIC SERVICE COMMISSION |
| 48 | 01513101052-INR | 2052 SECRETARIAL -GENERAL SERVICES(GRANTS-IN) |
| 49 | 01513101053-INR | 2053 DISTRICT ADMINISTRATION |
| 50 | 01513101055-INR | 2054 TREASURY AND ACCOUNTS ADMINISTRATION(GRANTS) |
| 51 | 01513101056-INR | 2055 POLICE |
| 52 | 01513101057-INR | 2058 STATIONERY PRINTING-EXPENDITURE A/C |
| 53 | 01513101058-INR | 2070 OTHER ADMS.SER.-OTHER EXPENDITURE |
| 54 | 01513101059-INR | 2071 PENS. OTHER RETIREMENT BENEFITS |
| 55 | 01513101060-INR | 2071 PENSION PAYMENT ECS DEBIT WITH CLG CHARGES |
| 56 | 01513101063-INR | 2202 GENERAL EDUCATION |
| 57 | 01513101064-INR | 2205 ART AND CULTURE |
| 58 | 01513101065-INR | 2210 MEDICAL and PUBLIC HEALTH |
| 59 | 01513101067-INR | 2215 WATER SUPPLY and SANITATION |
| 60 | 01513101069-INR | 2216 HOUSING |
| 61 | 01513101070-INR | 2217 URBAN DEVELOPMENT |
| 62 | 01513101071-INR | 2220 INFORMATION AND PUBLICITY |
| 63 | 01513101072-INR | 2230 LABOUR AND EMPLOYMENT |
| 64 | 01513101073-INR | 2235 SOCIAL SECURITY AND WELFARE |
| 65 | 01513101074-INR | 2245 RELIEF ON ACCOUNT OF NATURAL CALAMITIES |
| 66 | 01513101075-INR | 2251 SECRETARIAT-SOCIAL SERVICES |
| 67 | 01513101079-INR | 2404 DAIRY DEVELOPMENT |
| 68 | 01513101080-INR | 2405 FISHERIES |
| 69 | 01513101081-INR | 2406 FORESTRY WILD LIFE |
| 70 | 01513101082-INR | 2408 FOOD, STORAGE and WAREHOUSING |
| 71 | 01513101083-INR | 2425 CO-OPERATION |
| 72 | 01513101084-INR | 2501 SPECIAL PROGRAMMES FOR RURAL DEVELOPMENT |
| 73 | 01513101086-INR | 2515 OTHER RURAL DEVELOPMENT PROGRAMME |
| 74 | 01513101089-INR | 256 JAILS |
| 75 | 01513101090-INR | 259 PUBLIC WORKS |
| 76 | 01513101092-INR | 2851 VILLAGE AND SMALL INDUSTRIES |
| 77 | 01513101093-INR | 2852 INDUSTRIES |
| 78 | 01513101095-INR | 3451 SECRETARIAT-ECONOMIC SERVICES |
| 79 | 01513101015-INR | 1475 OTHER GENERAL ECONOMIC SERVICES |
| 80 | 01513101016-INR | 1601 GRANTS-IN-AID FROM CENTRAL GOVT. |
| 81 | 01513101019-INR | 2011 PARLIAMENT/STATE/UT/ LEGISLATURES |
| 82 | 01513101020-INR | 2012 PRESIDENT, V.P./GOVERNOR, ADMINR.OF U.Ts |
| 83 | 01513101021-INR | 2013 COUNCIL OF MINISTERS |
| 84 | 01513101022-INR | 2014 ADMN. OF JUSTICE |
| 85 | 01513101023-INR | 2014 ADMN.OF JUSTICE-EXP.ACCOUNT |
| 86 | 01513101024-INR | 2015 ELECTIONS |
| 87 | 01513101028-INR | 2029 LAND REVENUE |
| 88 | 01513101030-INR | 2030 STAMPS AND REGISTRATION- EXPENDITURE A/C |
| 89 | 01513101032-INR | 2039 STATE EXCISE- EXPENDITURE ACCOUNT |
| 90 | 01513201014-INR | 4801 CAPITAL OUTLAY on POWER PROJECTS |
| 91 | 01513201039-INR | 5054 CAPITAL OUTLAY ON ROADS BRIDGES |
| 92 | 01513201063-INR | 6003 INTERNAL DEBT OF STATE GOVERNMENT |

| | | |
|---|---|---|
| 93 | 01513201068-INR | 6202 LOANS for EDUCATION,SPORTS, ART CULTURE |
| 94 | 01513201072-INR | 6216 LOANS FOR HOUSING |
| 95 | 01513201075-INR | 6217 LOANS FOR URBAN DEVELOPMENT |
| 96 | 01513201078-INR | 6250 LOANS FOR OTHER SOCIAL SERVICES |
| 97 | 01513201083-INR | 6405 LOANS for FISHERIES |
| 98 | 01513201086-INR | 6425 LOANS FOR CO-OPERATION |
| 99 | 01513201089-INR | 6801 LOANS FOR POWER PROJECTS |
| 100 | 01513301036-INR | 7610 LOANS TO GOVERNMENT SERVANTS,ETC. |
| 101 | 01513301041-INR | 7610 LOANS TO GOVT.SERVANTS-HOUSE BUILDING |
| 102 | 01513301042-INR | 7610 LOANS TO GOVT.SERVANTS-M.CAR/M.CYCLE |
| 103 | 01513301044-INR | 7610 OTHER ADVANCES |
| 104 | 01513401015-INR | 8009 GEN.PROVIDENT FUND-OTHER THAN CLASS IV. |
| 105 | 01513401016-INR | 8009 GENERAL PROVIDENT FUND |
| 106 | 01513401017-INR | 8009 GENERAL PROVIDENT FUND-CLASS IV |
| 107 | 01513401025-INR | 8009 STATE PROVIDENT FUND-RECEIPTS |
| 108 | 01513401026-INR | 8009 STATE PROVIDENT FUNDS |
| 109 | 01513401032-INR | 8011 GENERAL INSURANCE SCHEMES-PAYMENTS |
| 110 | 01513401035-INR | 8011 INSURANCE PENSION FUNDS-GEN.INSURANCE SCHEM E-RECEIPTS |
| 111 | 01513401037-INR | 8011 INSURANCE PENSION FUNDS-STATE GOVT.SCHEME-R ECEIPTS |
| 112 | 01513401039-INR | 8011 OTHER INS. PEN. FUND-RECEIPTS |
| 113 | 01513401040-INR | 8011 STATE GOVT.INS.FUND-PAYMENTS |
| 114 | 01513401098-INR | 8229 OTHER DEVELOPMENT WELFARE FUND (RECEIPT |
| 115 | 01513401047-INR | 8121 GEN. OTHER RES.FUNDS-GEN.INS.FUND |
| 116 | 01513401048-INR | 8121 GEN. OTHER RES.FUNDS-GENERAL INSURANCE |
| 117 | 01513401088-INR | 8229 DEVELOPMENT AMD WELFARE FUNDS (RECEIPTS) |
| 118 | 01513401101-INR | 8121 STATE GOVT EMP GROUP PERSNL ACCIDENT SCHEME |
| 119 | 01513401102-INR | GENERAL MANAGER BRIHANMUMBAI MILK SCHEME WORLI LOC |
| 120 | 01513501011-INR | 8342 OTHER DEPOSITS |
| 121 | 01513701083-INR | 8670 PRE-AUDIT CHEQUES -P A.O.(STATE) BOMBAY |
| 122 | 01513701069-INR | 8658 SUSPENSE - DIVIDENDS, INTEREST ETC. CREDI |
| 123 | 01513701074-INR | 8658 SUSPENSE ACCOUNT |
| 124 | 01513801001-INR | 8782 EX ENG, AGR CONST DIV II WORLI |
| 125 | 01513801002-INR | 8782 EX ENG,PARKS GARDEN |
| 126 | 01513801003-INR | 8782 EX ENG,R.D.D IV ANDHERI |
| 127 | 01513801004-INR | 8782 Ex. Engg. Public Works Spl. Project Div. Aarey Goregaon Mumbai-65 |
| 128 | 01513801005-INR | 8782 EXE ENG, PRESIDENCY DIVISION |
| 129 | 01513801006-INR | 8782 EXECUTIVE ENGINEER, B/BAY RD. DEV. DESIGNS. |
| 130 | 01513801055-INR | 882 EXECUTIVE ENGINEER,INTEGRATED UNIT |
| 131 | 01513801007-INR | 8782 EXECUTIVE ENGINEER,CENTRAL BOMBAY DIVISION |
| 132 | 01513801008-INR | 8782 EXECUTIVE ENGINEER,NORTH BOMBAY DIVISION |
| 133 | 01513801009-INR | 8782 EXECUTIVE ENGINEER,NORTH BOMBAY ELECTRICAL |
| 134 | 01513801011-INR | 8782 HARBOUR ENGINEER,HARBOUR DIV.(NORTH) |
| 135 | 01513801015-INR | 8793 INTER STATE SUSPENSE ACCOUNT |
| 136 | 01513801050-INR | 882 EXECUTIVE ENGINEER, MULTI-STOREYED BUILDINGS, COURT DIVI |
| 137 | 01513801051-INR | 882 EXECUTIVE ENGINEER, SOUTH BOMBAY ELECTRICAL DI VISION |
| 138 | 01513901005-INR | Executive Engineer, Project Electrical Division, PWD Mumbai |
| 139 | 01513901006-INR | Exe.Engineer Central Mumbai Electrical Divn. PWD 8782 |
| 140 | 01514101066-INR | ADMINISTRATION OF JUSTICE |

| | | |
|---|---|---|
| 141 | 01514101069-INR | AGRICULTURAL REASERCH EDUCATION |
| 142 | 01514101075-INR | CENSUS SERVEY STATISTICS |
| 143 | 01514101082-INR | CITIZENSHIP |
| 144 | 01514201097-INR | GENERAL AND OTHER RESERVE FUNDS(PAYMENTS |
| 145 | 01514201069-INR | ELECTION - OTHER ADM SERVICE |
| 146 | 01514301025-INR | INTEREST BEARING DEPOSITS |
| 147 | 01514401006-INR | NON INTEREST BEARING DEPOSITS-(REVENUE DEPOSIT - S TATE) |
| 148 | 01514401087-INR | SAVINGS ACCOUNTS OTHER THAN PROVIDENT FUND |
| 149 | 01514401088-INR | SC,ST,BACKWARD CLASSES AND MINORITIES DEV |
| 150 | 01514501001-INR | SPORTS YOUTH SERVICES |
| 151 | 01514501007-INR | STATE GOVT. PENSION |
| 152 | 01514501024-INR | TECHNICAL EDUCATION |
| 153 | 01514501036-INR | Executive Engineer, Project Electrical Division PWD Mumbai |
| 154 | 01514501037-INR | THE EX ENG BUILDING CONSTRUCTION DIVSN |
| 155 | 01514501038-INR | THE EX ENG BUILDING CONSTRUCTION DIVSN |
| 156 | 01514501039-INR | THE EX ENG CENTRAL MUMBAI DIV |
| 157 | 01514501040-INR | THE EX ENG CONST. DIV III MUMBAI |
| 158 | 01514501041-INR | Ex. Engg. Public Works Spl. Project Div. Aarey Goregaon Mumbai-65 |
| 159 | 01514501042-INR | THE EX ENG MULTISTOREYED BLDGS CONST. DIV. MUMBAI |
| 160 | 01514501044-INR | THE EX ENG PRESIDENCY DIV. MUMBAI |
| 161 | 01514501046-INR | THE EX ENG R.D.D. IV MUMBAI |
| 162 | 01514501047-INR | THE EX ENG ROAD DEV. DIV. I MUMBAI |
| 163 | 01514501050-INR | THE EX. ENG NORTH MUMBAI DIV. MUMBAI |
| 164 | 01514501051-INR | THE EX. ENG. CENTRAL MUMBAI ELE. DIV PWD MUMBAI |
| 165 | 01514501052-INR | THE EX. ENG. INTEGRATED UNIT |
| 166 | 01514501053-INR | THE EX. ENG. NORTH BOMBAY ELECT. DIV MUMBAI |
| 167 | 01514501056-INR | THE SUPDT. PARKS GARDENS CDO BARRACK NO 2 MUMBAI |
| 168 | 01514501064-INR | VALUE ADDED TAX MAHARASHTRA |
| 169 | 01514501075-INR | 4408 FAIR PRICE SHOPS SCHEME |
| 170 | 01585901423-INR | PAO 8443 Virtual Personal Deposit Account PAO, Govt. of Maharashtra, Mumbai |
| 171 | 01585901055-INR | CONSUMER WELFARE FUND UNDER GST 8229 DEV AND WEL FUND |
| 172 | 01585901052-INR | SGST Maharashtra Refund Account |

______________